जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 AUG 2024

सकाळ



# शिवाजी विद्यापीठात सद्भावना दिन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात आज शांती व अहिंसा यांची शपथ घेत सद्भावना दिन झाला. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी सद्भावना शपथ दिली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 AUG 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात सद्भावना दिन साजरा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शांती व अहिंसा यांची शपथ घेत सद्भावना दिन साजरा करण्यात आला. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी उपस्थितांना सद्भावना शपथ दिली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. प्रकाश गायकवाड उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 AUG 2024
तरुण भारत

# विद्यापीठात सद्भावना दिन साजरा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात आज शांती व अहिंसा यांची शपथ घेत सद्भावना दिन साजरा करण्यात आला. भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंती निमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी सर्व उपस्थितांना सद्भावना शपथ दिली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. रामचंद्र पवार, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचेसह शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 AUG 2024
तरुण भारत

# कै.डॉ.रूपाली पणदुरकर महिला अभ्यासिकेसाठी ६० लाख देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील निवृत्त भूगोल अधिविभागप्रमुख डॉ. राम पणदुरकर व पत्नी हेमकिरण यांनी त्यांची कन्या, डॉ. रूपाली पणदुरकर यांच्या स्मरणार्थ विद्यापीठाला कसवा व शिका महिला वसतिगृहातील अभ्यासिकेसाठी ६० लाखांची देणगी दिली. त्यांनी यापुर्वी पहिल्या टप्प्यात ३५ लाखांचा धनादेश दिला होता. वसतिगृह विस्तारीकरणासाठी दुसरा २५ लाखांचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपुर्द केला. पणदुरकर दाम्पत्यांच्या अर्थसहाय्यामुळे अभ्यासिकेची संपूर्ण इमारत लवकर पूर्ण होईल. रूपालीच्या स्मृतिदिनी अभ्यासिकेचे उद्घाटन करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. 'शिकणाऱ्या नातीसाठी' रक्षाबंधनाला आजी-आजोबांकडून अभ्यासिकेच्या स्वरूपात भेट देत असून मुलींनी या अभ्यासिकेत शिकून खूप मोठे व्हावे, अशी भावना पणदुरकर दाम्पत्याने व्यक्त केली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. संभाजी शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

21 AUG 2024 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात संगणक निर्मितीवर एक दिवशीय कार्यशाळा

प्रतिनिधी

कोल्हापूर

संगणकाच्या विद्यार्थ्यांसाठी असणारे महत्व ओळखून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डि. टी. शिर्के यांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्यवाढीसाठी विद्यार्थ्यांच्या सहभागातून संगणक बनवण्याची संकल्पना मांडली. या संकल्पनेचा उद्देश विद्यार्थ्यांना संगणकाच्या सुट्या भागांची ओळख व्हावी, त्यांची कार्यप्रणाली समजावी व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतानाच स्वतः संगणक बनवण्याचे कौशल्य प्राप्त करावे हा आहे.

यात बी. टेक. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंगच्या तसेच एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्सच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रायोगिक तत्वावर पाच संगणक बनवण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागात एकदिवसीय शिबीर आयोजित करण्यात आले. यात विद्यार्थ्यांना संगणकासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुट्या भागांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी संगणक बांधणी व ऑपरेटिंग सिस्टिम इंस्टॉलेशनच्या प्रात्यक्षिकाचा अनुभव घेतला. अंदाजे दोन तासामध्ये पाच संगणक तयार केले.

सर्व संगणक हे विद्यापीठाच्या संगणक विभागाकडे कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते पुढील कार्यवाहीसाठी हस्तांतरित करण्यात आले. या प्रसंगी मार्गदर्शन करताना, कौशल्य वाढविण्याचे तसेच स्पेशल परपज मशीन बनवण्याचे आवाहन कुलगुरूंनी केले. या उपक्रमासाठी डॉ. एस. ए. शिंदे व. डॉ. एस. बी. चव्हाण हे समन्वयक म्हणून काम पहात असून इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग व तंत्रज्ञान अधिविभाग हा उपक्रम संयुक्तपणे राबवत आहेत. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे अधिविभागप्रमुख डॉ. पी. के. गायकवाड, डॉ. एस. एन. सपली, डॉ. एम. के. भानारकर, डॉ. एस. एम. मस्के आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 AUG 2024

पुण्यनगरी

# विद्यापीठात कॉन्टेम्पोररी नृत्य कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे कॉन्टेम्पोररी नृत्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा दि. २० ते २२ ऑगस्ट दरम्यान संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात होणार आहे. कार्यशाळेसाठी 'शोवन दास' (बांगलादेश) हे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेत बॉडी अवेयरनेस, फिजिकल अँड मेंटेन बॉडी, कॉन्टेम्पोररी डान्स फ्रेजेस, ब्लॉकिंग, बेसिक बॅलेट डान्स प्रॅक्टिस, क्रिएटिंग मुव्हमेंट, फ्लोअर वर्क, मेडिटेशन इन डान्स इत्यादी विषयांबद्दल मार्गदर्शन केले जाणार आहे, अशी माहिती संगीत व नाट्यशास्त्र प्र. विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 AUG 2021

सकाळ

# मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी संशोधन महत्त्वाचे : डॉ. दगडे

कोल्हापूर, ता. २० : "मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी संशोधन हे महत्त्वाचे आहे. संशोधन चांगल्या प्रतीचे व्हावे, यासाठी 'आविष्कार' सारख्या स्पर्धा महत्त्वाच्या ठरतात. विद्यार्थी संशोधनाच्यादृष्टीने प्रोत्साहित व्हावे, यासाठी 'आविष्कार' ही स्पर्धा २००५ मध्ये तत्कालीन राज्यपालांनी सुरू केली. 'आविष्कार' स्पर्धेबाबत शिवाजी विद्यापीठांतर्गत असणाऱ्या सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी, हा कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे," असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे 'आविष्कार' समन्वयक डॉ. डी. एच. दगडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग आणि न्यू कॉलेजतर्फे एक दिवसीय 'आविष्कार' संशोधन स्पर्धा माहिती कार्यशाळा झाली.

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील यांनी सहभागी विद्यार्थ्यांना संशोधनाचे महत्त्व प्रतिपादन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले. सहभागी विद्यार्थ्यांना डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. आर. एच. अतिग्रे, डॉ. एस. बी. महाडिक, डॉ. एम. एस. निंबाळकर, डॉ. पी. के. पवार, डॉ. पी. एम. माने, डॉ. टी. एम. चौगले, डॉ. एस. एम. भोसले, मागील वर्षीच्या 'आविष्कार' संशोधन स्पर्धेतील विजेते सुरजित अडगळे, मुनीफ अन्सारी यांनी विविध विषयांना मार्गदर्शन केले.

सुरेखा आडके, उपप्राचार्य डॉ. आर. डी ढमकले, प्रबंधक एम. वाय. कांबळे उपस्थित होते. सरोज देशमुख यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. मनीषा नायकवडी यांनी सूत्रसंचालन केले. 'आविष्कार' समन्वयक डॉ. ए. आर. कांबळे-जगतकर यांनी आभार मानले. 'आविष्कार' समिती सदस्य, विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 AUG 2024
लोकमत

# दूर शिक्षण केंद्रात प्रवेशाची संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महाराष्ट्र व कर्नाटक सीमाभागातील विद्यार्थ्यांना दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात प्रवेशाची संधी असल्याचे प्रतिपादन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी व्यक्त केले. सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रियेबाबत बेळगाव येथील दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळाच्या भाऊराव काकतकर कॉलेजमध्ये आयोजित उदबोधन कार्यशाळेत ते बोलत होते. संस्थेचे सचिव विक्रम पाटील अध्यक्षस्थानी होते.

दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळाचे यावेळी खजिनदार प्रकाश मरगळे, खानापूर तालुका मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे अध्यक्ष गोपाळ देसाई, सदस्य गोपाळराव पाटील, प्राचार्य डॉ. एस. एन. पाटील उपस्थित होते. डॉ. कृष्णा पाटील म्हणाले, नोकरी व व्यवसाय सांभाळून महिला, विद्यार्थी, शेतकरी, उद्योजक, कामगार यांना दूरशिक्षण केंद्राच्या एकूण १३ अभ्यासक्रमासाठी प्रवेशित होता येते. याचा फायदा सीमाभागातील विद्यार्थी व कर्मचारी यांनी घ्यावा. यावेळी सहायक प्रा. डॉ. सचिन भोसले, प्राचार्य डॉ. एस. एन. पाटील यांनी मार्गदर्शन केले. डॉ. एम. व्ही. शिंदे यांनी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एम. एस. पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 AUG 2024
तरुण भारत

# 'दूरशिक्षण'मध्ये समन्वयक, लेखनिकांची कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्यावतीने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ८६ महाविद्यालयांच्या दूरशिक्षण अभ्यास केंद्रातील समन्वयक व लेखनिकांची कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे होते. संगणक चालक विकास मोहिते यांनी ऑनलाइन प्रवेश अर्जाबाबत माहिती दिली. डॉ. मुफिद मुजावर यांनी प्रात्यक्षिक सादर केले. अभ्यास केंद्राबाबत डॉ. के. बी. पाटील यांनी मार्गदर्शन केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले. यावेळी सहाय्यक कुलसचिव दिलीप मोहाडीकर, महेश साळोखे, विश्वनाथ वरुटे, राजेंद्र आंदरगिसके, मिलिंद सुरुलकर, सनद आडमुठे, अमोल आडगुळे, प्राध्यापक, समन्वयक व लेखनिक आदी उपस्थित होते.

21 AUG 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



विज्ञान-तंत्रज्ञान

# चंद्र दूर जातोय..!

डॉ. व्ही.एन. शिंदे

चंद्र हा पृथ्वीचा उपग्रह. याच चंद्रावर सफर घडवून आणण्याचे स्वप्न एलन मस्क दाखवत आहेत. अशोक सराफ अर्थात मामा त्यांच्या मंगलासाठी चंद्रावर बंगला बांधण्याचे आश्वासन देत गातात, 'मंगला ग मंगला... तुझ्यासाठी चंद्रावर बांधीन मी बंगला...' आकाशातील चंद्र दाखवत अनेक प्रेमवीर आपल्या रुसलेल्या सखीची मनधरण करतात. १९५९ मध्ये प्रदर्शित झालेले 'बरखा' चित्रपटातील लताजी आणि मुकेश यांच्या आवाजातील जगदीप आणि नंदा यांच्यावर चित्रीत झालेले, 'इक रातमे दो दो चांद खिले, एक घुंघटमे एक बदलीमे...' हे गाणे आजही तितकेच ताजे वाटते, आजच्या पिढीलाही आपले वाटते. प्रियकराकडून सखीच्या चेहऱ्याला चंद्राचीच उपमा दिली जाते. अजून तरी त्याला पर्याय सापडला आहे असे दिसत नाही. देत असतील तर आमचे अज्ञान. मात्र, चंद्रच आजतरी आघाडीवर आहे. कुसुमाग्रज तर चंद्राला पृथ्वीवर एकतर्फी प्रेम करणारा प्रेमवीर मानतात. चंद्र सर्वांनाच इतका जवळचा वाटतो की, चंद्राचा नेहमीच उल्लेख एकेरी करण्यात येतो, मग तो साहित्यातील असो किंवा बोली भाषेत; असा सर्वव्यापी चंद्र लहान मुलांचा 'लिंबोणीच्या झाडामागे लपणारा मामा' आज पुन्हा चर्चेत आला आहे.

त्याचे कारण म्हणजे सर्वांच्या जवळचा हा चंद्र पृथ्वीपासून दूर जात असल्याचे संशोधकांच्या लक्षात आले आहे. संशोधकांच्या हाती नऊ कोटी वर्षांपूर्वीचा एक दगड लागला. चंद्र निर्माण कसा झाला हे समजून घेण्यासाठी संशोधकांकडून या दगडाचा अभ्यास सुरू करण्यात आला होता. या अभ्यासात अनेक गोष्टी संशोधकांच्या लक्षात आल्या. या अभ्यासातूनच संशोधकांच्या लक्षात आले की, चंद्र कालौघात पृथ्वीपासून दूर जात आहे. आज कुसुमाग्रज असते तर त्यांनी 'आपल्या प्रेमाला पृथ्वी प्रतिसाद देत नाही हे पाहून, चंद्र दूर जात आहे असे सांगितले असते. मात्र, आज कुसुमाग्रज नाहीत आणि चंद्रावर भाष्य करणारे विस्कॉन्सिन-मॅडिसन विद्यापीठातील कवी नव्हे तर संशोधक आहेत.

या विद्यापीठामध्ये गत अनेक वर्षांपासून या विषयावर संशोधन सुरू आहे. या संशोधनातून चंद्राबाबत अनेक खुलासे केले आहेत. यातून निश्चितच लहान मुलांपासून ज्येष्ठापर्यंत सर्वांचे कुतूहल काही प्रमाणात शमले आहे. आज चंद्र हा पृथ्वीपासून ३,८४,४०० किलोमीटर अंतरावर आहे. चंद्रावरील एक दिवस हा पृथ्वीवरील चौदा दिवसांच्या बरोबर आहे. दिवसा चंद्रावर प्रचंड तापमान वाढते, तर रात्री कडाक्याची थंडी पडते. चंद्रावरील कमाल तापमान हे १०० तर किमान तापमान उणे २०० डिग्री सेल्सियस असते. चंद्राला पृथ्वीभोवती एक फेरी पूर्ण करण्यासाठी साधारण सत्तावीस दिवस लागतात. आज हा चंद्र पृथ्वीच्या अगदी जवळ म्हणजे ३,६४,३९७ तर सर्वात दूर म्हणजे ४,०६,७३१ किलोमीटर अंतरावरून अंडाकृती कक्षेत फिरत आहे. हे अंतर मोजण्यासाठी पूर्वीच्या चांद्रमोहिमेत चंद्रावर लेसर परावर्तक बसवण्यात आले आहेत. पृथ्वीवरून त्यावर लेसर किरण पाठवतात आणि त्याला पृथ्वीवर यायला किती वेळ लागतो यावरून हे अंतर मोजण्यात येते. चंद्राच्या गुरुत्वीय बलांमुळे समुद्राची भरती आणि ओहोटी आपण अनुभवत असतो. तसेच पृथ्वीची स्वतःभोवती फिरण्याची



म्हणजेच परिवलन गती चंद्राच्या वागण्यावर अवलंबून आहे. परिवलन गतीवर दिवसाचा कालावधी अवलंबून असतो. संशोधकांच्या निष्कर्षानुसार सन १६०० पासून आजवर पृथ्वीचा दिवस १.०९ मिलीसेकंदाने वाढला आहे. म्हणजे सोळाशे वर्षांपूर्वी दिवस हा २४ तासांपेक्षा कमी कालावधीचा होता. 'प्रोसिडिंग्ज ऑफ नॅशनल ॲकेडमी ऑफ सायन्सेस'मध्ये प्रकाशित शोधनिबंधात हे निष्कर्ष देण्यात आले आहेत.

पूर्वी चंद्र पृथ्वीच्या फार जवळ होता. हा निष्कर्ष समुद्रातील प्रवाळावर असणाऱ्या रेषांच्या अभ्यासातून काढला आहे. भरती आणि ओहोटीचे एक चक्र पूर्ण झाले की समुद्री प्रवाळावर एक रेष उमटलेली आढळून येते. प्रवाळांच्या सापडलेल्या जिवाष्मातूनही काही निष्कर्ष संशोधकांच्या हाती आले आहेत. ४५ कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवरील दिवस हा आठ तासांचा होता. त्यानंतर पृथ्वीवर एक मोठी उल्का आदळली आणि चंद्र पृथ्वीपासून तयार झाला. त्यानंतर पृथ्वीच्या फिरण्याचा वेग मंदावला. साधारण ३२ कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीपासून केवळ २,७०,००० किलोमीटर अंतरावर हा चंद्र होता. त्यावेळी त्याचा पृथ्वीवरील एक दिवस हा १३ तासांचा होता. साधारण ८.५ कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवरील दिवस २१ तासांचा असल्याचे पुरावे संशोधकांनी दिले आहेत, तर चार कोटी वर्षांपूर्वीचा दिवस हा २२ तासांचा होता.

हाच अभ्यास आणि चंद्र आणि पृथ्वी यामधील वाढते अंतर यांचा विचार करून विस्कॉन्सिन-मॅडिसन विद्यापीठातील भूशास्त्रज्ञ स्टीफन मेयर्स हे सांगतात, 'चंद्र जसजसा दूर जात आहे, तस तसा पृथ्वीचा स्वतःभोवती फिरण्याचा वेग मंदावत आहे. हे संशोधन नवे नाही, मात्र यात आज तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अचूकता आली आहे. चंद्र दरवर्षी ३.८ सेंटिमीटर वेगाने पृथ्वीपासून दूर जात आहे. याच वेगाने पृथ्वीपासून चंद्र दूर जात राहिल्यास २०० कोटी वर्षांनी पृथ्वीला स्वतःभोवती एक फेरी पूर्ण करण्यास पंचवीस तास लागणार आहेत. म्हणजेच पृथ्वीवरील दिवस हा २४ तासांचा न राहता २५ तासांचा असेल. माणसाचे संपूर्ण दिनचक्र त्यानुसार बदलेल. घड्याळेही बदलावी लागतील. आजवर हे सारे बदलत आले आहे. मात्र, हा कालावधी इतका मोठा आहे की हे पाहायला आपली पणत-पणत नातवंडेही असणार नाहीत. आपल्या हयातीत तर हे घडणारच नाही, त्यामुळे आपण याची चिंता करण्याचे कारण नाही.

पृथ्वी आपल्या प्रेमाला दाद देत नाही, हे पाहून हा चंद्र दूर जातोय असे खरंच मानायचे का? चंद्र दूर गेला म्हणून तसा फरक पडणार नाही, टाळताही येणार नाही. मग आज 'हात तुझा हातात अन धुंद ही हवा, रोजचाच चंद्र आज भासतो नवा नवा' असे प्रेमीयुगलाने चंद्राच्या साक्षीने बिनधास्त गावे. तो नाराज होऊन दूर जात असला तरी प्रेमवेडे काही चंद्राला सोडणार नाहीत. त्याच्या साक्षीने नवी गीते लिहितील आणि त्याच्या साक्षीने गातीलही. अगदी कोट्यावधी वर्षे. जर असे घडायला २०० कोटी वर्षे लागणार असतील तर आज त्याची चिंता कशाला...

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००